**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय**
पुणे महानगरपालिका
जा.क्र.: अतिमआ/साप्रवि/आस्था/ ९३६५
दिनांक :- १२/०५/२०२२

**-: आदेश :-**

**विषय :-** श्री. अजित देशमुख, उप आयुक्त, कर आकारणी व कर संकलन यांचे रजा कालावधीत त्यांचे पदाचे कामकाज व्यवस्थेबाबत.

**संदर्भ :-** १) घनकचरा व्यवस्थापन विभाग यांचा जावक क्र. घकव्यका/३२४, दिनांक २७/०४/२०२२.
२) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. १/ ३३, दिनांक १०/०५/२०२२.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील श्री. अजित देशमुख, उप आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग यांनी दिनांक १७/०५/२०२२ ते २०/०५/२०२२ (दिनांक १४/०५/२०२२ ते १६/०५/२०२२ आणि दि.२१/०५/२०२२ व २२/०५/२०२२ या सार्वजनिक सुट्ट्या जोडून) अखेर या कालावधीमध्ये बाहेरगावी जायचे असल्यामुळे हक्काची रजा मिळणेस आणि दिनांक १४/०५/२०२२ ते २०/०५/२०२२ अखेर मुख्यालय सोडणेस मान्यता मिळणेस संदर्भ क्र. १ चे अर्जान्वये विनंती केली आहे. त्यास मा. महापालिका आयुक्त यांची संदर्भ क्र. २ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

श्री. अजित देशमुख यांचे रजा कालावधीत त्यांचेकडील उप आयुक्त (कर आकारणी व कर संकलन) या पदाचा अतिरिक्त पदभार श्री. सचिन इथापे, उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

श्री. सचिन इथापे, उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांनी स्वत:च्या पदाचे कामकाज सांभाळून उपरोक्तप्रमाणे अतिरिक्त कामकाज करावयाचे आहे. तसेच, वरीलप्रमाणे पदभार स्विकारलेबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

Ravi
(रविंद्र बिनवडे)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका
18/5/2022

प्रत :- **खातेप्रमुख (सर्व)**, पुणे महानगरपालिका.